जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ९०२ दिनांक - २९/१२/२०२३**

चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

**कोयत्याने, दगड, विटांनी मारहाण करणारे गुंडांना प्रतिकार करुन,जखमीं नागरीकांचा जीव वाचविणा-या, रणरागिनी महिला पोलीस अंमलदार, सिमा वळवी यांनी केलेल्या उत्कृष्ठ कामगिरीबाबत मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांचेकडुन सत्कार**

दि.२४/१२/२०२३ रोजी २३/१५ वा.चंदननगर पोलीस ठाण्याचे महिला पोलीस अंमलदार, सीमा वळवी हया बंदोबस्त संपवुन निवासस्थानी जात असताना,आनंदपार्क रस्त्यावर काही तरुण आप-आपसात वाद घालुन भांडण करीत असताना दिसुन आल्याने,त्यांनी सदर ठिकाणी थांबुन त्यांना आप-आपसात भांडु नका असे समजावुन सांगत असताना, त्यांचे पाठीमागुन एका इसमाने हातामध्ये धारधार हत्यार घेवुन पळत आला व त्याठिकाणी जमा झालेल्या इसमांना मारहाण करु लागला. तसेच धारधार हत्यार घेवुन इतर इसम देखील तेथे पडलेले दगड विटांनी एकमेकांना मारहाण करु लागले. त्यावेळी महिला पोलीस अंमलदार, सीमा वळवी यांनी प्रसंगावधान राखुन व गुन्हेगार यांना प्रतिकार करुन त्या जखमी इसमांची सुटका करुन,तात्काळ घटनास्थळी इतर पोलीस स्टाफ बोलावुन घेवुन,भांडण करणारे आरोपीतांना गुन्हा घडल्यानंतर घटनास्थळी येवुन व त्यांचा पाठलाग करुन अवघ्या २० मिनीटांमध्ये ०५ आरोपींतांना ताब्यात घेतले. त्यामुळे गुन्हा उघडकीस येवुन,**गुन्ह्यातील आरोपीत नामे १)अनुज जितेंद्र यादव,वय-१९ वर्षे,रा.आनंदपार्क वडगांवशेरी पुणे २)हरिकेश टुणटुण चव्हाण,वय-१८ वर्षे,रा.सदर ३)आकाश भारत पवार,वय-२३ वर्षे,रा.सदर ४)अमोल वंसत चौरघडे ५)संदेश सुधिर कांबळे यांना अटक करण्यात आलेली आहे.** तसेच भांडणा मध्ये गंभीर जखमी झालेल्या सौरभ संतोष पाडाळे, श्रुषिकेश ढोरे, यांना तात्काळ औषधोपचाराकामी हॉस्पीटलमध्ये दाखल केलेले आहे.

या घटनेबाबत जखमी मुलगा नामे सौरभ संतोष पाडाळे,वय-२२ वर्षे,रा.पाडाळे निवास बिकानेर स्वीटचे वरती सोमनाथनगर वडगांवशेरी,पुणे यांनी त्यास त्याचा मित्र नामे श्रुषिकेश ढोरे, अभि आगरकर, योगेश कदम यांना १)आकाश पवार, २)अनुज यादव ३)हरिकेश चव्हाण ४)अमोल चोरघडे ५)अक्षत तापकिर ६) राहुल बारवसे व इतर मुले यांनी जीवे ठार मारण्याचे उद्देशाने लोखंडी धारधार हत्याराने, दगड व विटांनी जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करुन गंभीर जखमी केले म्हणुन त्यांचेविरुध्द **चंदननगर पोलीस ठाणे गु.र.नं.५९१/२०२३ भा.द.वि कलम ३०७,३२६,३२४, १४३,१४४,१४७,१४८,१४९,आर्म ॲक्ट कलम ४(२५),महा.पो.ॲक्ट कलम ३७(१)(३)१३५,क्रिमीनल लॉ अमेडमेंट कलम ३ व ७** कलमान्वये दिनांक २५/१२/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

महिला पोलीस अंमलदार, सीमा वळवी यांनी केलेल्या उत्कृष्ठ कामगिरीबाबत मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे),श्री.रामनाथ पोकळे, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उपआयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे, मा.पोलीस उप-आयुक्त,परि-०३,श्री. शशिकांत बोराटे, श्री.संभाजी कदम यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.राजेंद्र लांडगे, पोलीस निरीक्षक,गुन्हे,श्रीमती. मनिषा पाटील व इतर टिमचे अभिनंदन करुन,विशेष कामगिरी करणारे महिला पोलीस अंमलदार, सीमा वळवी यांचा सत्कार केला आहे.

